**प्रेसनोट**

भा वि पो स्टे पुणे
दि. १७/०४/२०१९

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडुन सराईत गुन्हेगारासह एकुण १६ इसमां विरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल**

दि.१६/०४/२०१९ रोजी फिर्यादी नामे श्री. रविंद्र लक्ष्मण ब-हाटे, वय-५६ वर्षे, धंदा- बांधकाम व सामाजीक कार्य, रा. स नं ८/६, सरगम सोसायटी, धनकवडी पुणे ४३ मो नं ७०३०३५३८४८ यांनी दि. २९/०१/२००८ रोजी इसम नामे लक्ष्मण जगदाळे व बाबा शेख यांना राजाराम सोनु पोकळे व इतर नातेवाईक यांनी त्यांची मौजे धायरी स नं १४९ हिस्सा नं ८ अ/1 मध्ये १० गुंठे जमीन मधील जमीनीची शिवपार्वती डेव्हलपर्सचे भागीदार विनोद नरबत मारवाडी व राजेंद्र बाळासाहेब मारवाडी रा. उरूळी देवाची ता. हवेली जि. पुणे यांना विक्री केली असल्याचे माहिती असताना देखील सदर जागा मालक पोकळे व इतर नातेवाईक यांचेशी संगणमत करून आम्हास सदरची जागा ही निर्धोक व क्लीअर टायटल आहे असे भासवुन सदरची जागा सह दुय्यम निबंधक कार्यालय हवेली २० पुणे यांचे कार्यालयास विकसन करारनामा दस्त क्र १०३५/२००८ व कुलमुखत्यार दस्त क्र १०३६/२००८ अन्वये बनावट दस्त तयार करून देवुन मुद्रांक शुल्क रू २,०९,०००/-, नोंदणी फी शुल्क रू ३०,४६०/-, शेख व जगदाळे यांना कमीशन करीता रक्कम रू १,००,०००/- तसेच जागा मालक यांना जागेच्या बदल्यात रक्कम रू ३०,००,०००/- अशी एकुण ३३,३९,४६०/- रू ची फसवणुक केली. तसेच आमचे झालेल्या फसवणुकीबाबत आम्ही लक्ष्मण जगदाळे यांचे दांडेकर पुल येथील कार्यालयात विचारणा करणेकरीता गेलो असता लक्ष्मण जगदाळे यांचा भाउ राम जगदाळे याने आम्हास ''पोकळे आमची माणसे आहेत, मीच तो व्यवहार करण्यास सांगतला आहे. मी नुकताच एका नगरसेवकाचा खुन केलेला आहे तुम्ही पुन्हा आमचे ऑफीस मध्ये आला तर तुम्हाला जिवे ठार मारीन'' अशी धमकी दिली म्हणुन माझी इसम नामे १) लक्ष्मण जगदाळे २) राम जगदाळे ३) बाबा शेख (संपुर्ण नाव पत्ता माहिती नाही) ४) राजाराम सोनु पोकळे वय ५५ वर्षे रा. जनता वसाहत पर्वती पुणे ५) सरूबाई नारायण भोसले वय ७० वर्षे, रा.च-होली बु पुणे ६) शांताबाई पाडुरंग शिवतारे वय ६८ वर्षे रा. स नं १३० दांडेकर पुल पुणे ७) पुष्पाबाई अनंता कटके वय ६५ वर्षे रा. वडगाव बु पुणे ८) दिलीप बबन कोतवाल वय ४९ वर्षे, महादेवनगर मांजरी पुणे ९) अशोक बबन कोतवाल वय ३८ वर्षे, रा. सदर १०) शोभा वसंत पवार वय ४७ वर्षे रा.सदर ११) हिराबाई वसंत भांडेकर वय ६० वर्षे, रा. आंबेठाण ता खेड पुणे १२) संजय ज्ञानेश्वर पोकळे वय ३५ वर्षे, रा. जिवनधारा सोसायटी धनकवडी पुणे १३) विमल बाळासाहेब धावले वय ५० वर्षे, रा. सदर १४) वंदना अजय काळे वय ३१ वर्षे रा.महादेवनगर मांजरी पुणे १५) निता बाळासाो इंगळे वय ३० वर्षे रा.सदर १६) ताराबाई ज्ञानेश्वर पोकळे वय ६५ वर्षे, रा. सदर यांचे विरूध्द तक्रार दिल्याने भा वि पो स्टे येथे गु र नं ३१५/१९ भादवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ५०६(२), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी यांना गुन्हयातील सराईत गुन्हेगार राम भरत जगदाळे याने जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांनी सदर बाबत तक्रार केली नव्हती परंतु सदर आरोपी विरूध्द सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल होवुन त्यामध्ये त्यास अटक झाल्याने फिर्यादी यांना धिर आल्याने तब्बल ११ वर्षांनी फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी नामे रामभरत जगदाळे वय ३६ वर्षे, रा. स्वामी ओम ग्रुप, बंगला नं १०, पर्वती पायथा सहकारनगर पुणे यास सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु र नं २८९/२०१९ भा द वि क ३८६, ३४१, ५०६(२), ३४ प्रमाणे दाखल गुन्हयातुन वर्ग करून दि. १७/०४/२०१८ रोजी अटक करण्यात आलेली आहे.